**सं.फौ.ख.क्र.४२०/२०२३**

**सरकार –वि– शरद पवार**

**निशाणी क्र. १६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – हिरामण बाळा महाले

वय – ६०

धंदा – शेती

राहणार – भुत्याणे, ता. चांदवड, जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.२८.०४.२०२३ रोजी मी आदिवासी वस्ती भुत्याणे येथे पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. मला आता घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूराविषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी सही आहे. सहीला **निशाणी १७** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, तपासी अंमलदार यांनी मला सांगितले की, आरोपी भुत्याणे गावी आदिवासी वस्तीमध्ये चोरट्यारितीने देशी प्रिंस संत्राची विक्री करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी पंचनामा करण्यासाठी त्यांनी मला व दुसरा पंच समाधान आहेरला येण्याची विनंती केली. त्याला मी संमती दिली. हे म्हणणे खरे नाही की, भुत्याणे ग्रामपंचायतीजवळून पायी आदिवासी वस्तीजवळ गेलो असता एक इसम घराच्या पडवीत संशयास्पद हालचाल करतांना दिसला व तेथे लोकांची गर्दी दिसली त्यामुळे त्याला पोलिसांनी जागीच पकडले. हे म्हणणे खरे नाही की, त्याने त्याचे नाव शरद पवार असे सांगितले होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्यावर छापा टाकून त्याची झडती घेतली असता देशी दारु प्रिंस संत्रा सिलबंद ७२ बॉटल मिळून आल्या व त्या पोलिसांनी आमच्यासमक्ष जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी एक बाटली पोलिसांनी सॅम्पल म्हणून काढून घेतली व त्यावर आमच्या व पोलिसांच्या सह्यांची कागदी लेबले लावली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष केलेल्या पंचनाम्यावर मी वाचून सही केली.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या गावचा असल्यामुळे त्याच्याशी माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलततपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. डी. ए. आहेर यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.10 17:51:33 +0530

**दि. १०.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**